# पवनविजय

## Manuscript



श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसद्गुरवे नमः ॥ पवनविजय आपला आपण ॥
पहावा म्हणे मुकुंदराज ॥ शिवाप्रती पुसे भवानी ॥ तुम्हीं अखंड हृदय-
भुवनीं ॥ निरंतर योगासनीं ॥ जैसे तैसे आहांत ॥ १ ॥ एकवेळां आला
जन्मासी ॥ आपण अखंडित अभ्यासी ॥ तो योग अभ्यास मजसी ॥
क्रियेसहित सांगिजे ॥ २ ॥ संतोषला कर्पूरगौर ॥ गौरी बरवा पुसिला
विचार ॥ तें सुख निर्धार ॥ सांगो तुम्हांतें ॥ ३ ॥ येतां जातां कार्य करितां ॥
सुख दुःखादि झुंजतां ॥ समाधिसुखें हालतां डोलतां ॥ सर्वथाही नढळेचि
॥ ४ ॥ श्रीदत्त वसिष्ठ वामदेव ॥ नारदादी ऋषी सर्व ॥ श्रीव्यास शुक
गण गंधर्व ॥ हेंचि ध्यान करिताती ॥ ५ ॥ हेंचि सेविती सुरवर ॥ सर्व सुख
अपार ॥ ऋद्धि सिद्धीचें माहेर ॥ मंगळदायक जें ॥ ६ ॥ नर तोचि
नारायण ॥ सदां हृदयीं सोहं स्मरण ॥ त्याचें चुके जन्म मरण ॥ स्वयंभू तो
सदोदित ॥ ७ ॥ सद्गुरुकृपें स्वरोदय ज्ञान ॥ कळे भूत भविष्य वर्तमान ॥

घडे परत्र साधन ॥ यथार्थ असतां ॥ ८ ॥ आप तेज पृथ्वी आकाश ॥ वायु हे पांच तत्वप्रकाश ॥ स्वरोदय निःशेष ॥ खेळ ययाचा ॥ ९ ॥ ऐक स्वरोदयाच्या खेळा ॥ एक इडा एक पिंगळा ॥ सुषुम्नाहि जिव्हाळा ॥ जाण या देहीं ॥ १० ॥ वाम दक्षिणइडा पिंगळा जाण ॥ वाम इडा चंद्राचें स्थान ॥ दक्षिण पिंगला आपण ॥ सूर्य असे ॥ ११ ॥ चंद्र सूर्य बरोबर चाले ॥ तेचि सुषुम्ना वहिले ॥ अज्ञानरूपीं नाशिले ॥ सर्व कार्य विनाशे पैं ॥ १२ ॥ इडा पिंगला क्षणक्षणा ॥ पालटती दुश्चिन्हा ॥ तेंचि जाण दुःख मना ॥ विपरीत वोखटें जाणावें ॥ १३ ॥ वाम नाडी अमृत रूपिणी ॥ दक्षिण नाडी जगव्यापिनी ॥ असिपदें वेष्टोनी ॥ अहं सोहं चाले ॥ १४ ॥ चंद्र तो सम जाणावा ॥ रवि विषम ओळखावा ॥ चंद्र तो स्त्री बरवा ॥ रवि पुरुष जाण पैं ॥ १५ ॥ क्रूरकर्मी भानु असावा ॥ शुभ कर्मीं चंद्र वाहावा ॥ क्रूरकर्मीं लक्षावा ॥ भास्कर तो ॥ १६ ॥ स्थिर



कर्मासि चंद्र पाहाणें ॥ अलंकारादि भूषणें ॥ विविध वस्तु संग्रह करणें ॥ शांतिकर्मागणें चंद्रावरी ॥ १७ ॥ दिनमुहूर्तादि द्यावी ॥ विवाह लग्नें साधावीं ॥ दासी गज अश्व महिषी आणावी ॥ गृहप्रवेश चंद्रें कीजे ॥ १८ ॥ सद्गुरु देव स्वामींचें दर्शन ॥ मंगळदायक कार्य कारण ॥ अप्राप्त तें मागणें ॥ चंद्रावरी जाण पां ॥ १९ ॥ कल्याणदायक आरंभ ॥ सर्व शास्त्रांचा प्रारंभ ॥ वश्यकरणाचा मार्ग ॥ कीजे चंद्रावरी ॥ २० ॥ सूर्य साधावा चोरीसि जातां ॥ वादियांसि झुंजतां वार घालितां ॥ गज रथ अश्व आरूढतां ॥ यंत्र मंत्रीं सूर्य पाहणें ॥ २१ ॥ औषधीं द्यावी सिद्धि साधावी ॥ आकर्षणें करावीं विषें हरावीं ॥ भूतें प्रेतें राक्षसें त्रासावीं ॥ रवि वाहतां ॥ २२ ॥ क्रय विक्रय करणीं ॥ आसन शयन भोजनीं ॥ रवि वाहतां मैथुनीं ॥ साधकेश्वरी ॥ २३ ॥ जेणें मरणादिक ॥ कर्में शठ कर्में सकळिक ॥ नदीं समुद्रीं बुडतां देख ॥ स्वरबळें तरतील

॥ २४ ॥ जारण मारण स्तंभन ॥ पुरुष मोहन वशीकरण ॥ नदी समुद्रीं तरण ॥ उच्चाटण नदीं वाहतां ॥ २५ ॥ श्रीशंकर म्हणे पार्वती ॥ इडा पिंगला बरव्या चालती ॥ तयांसि संक्रमण म्हणती ॥ करिती अशुभ लाभ हानी ॥ २६ ॥ सुख दुःखाचा प्रश्न केला ॥ लाभ अलाभ पुसिला ॥ दोन्ही सम वाहिला ॥ तरी तो नाशवंत ॥ २७ ॥ संक्रमण वाहतां ॥ ईश्वर स्मरावा ज्ञाता ॥ क्षणक्षणां सूर्य पालटतां ॥ ते सुषुम्ना वोखटी ॥ २८ ॥ ते सकळ कर्मनासी ॥ विवादीं जय नाहीं त्यासी ॥ विष न उतरे धन्वंतरी-यासी ॥ जरी विपरीत वाहे ॥ २९ ॥ मंत्र यंत्र न चालती ॥ ठायीं बैसल्या आघात येती ॥ मित्र द्वेष करिती ॥ सुषुम्ना वाहे तोंपर्यंत ॥ ३० ॥ आतां कोपला देव सद्गुरु ॥ मारावया काढितां तस्करु ॥ जरी शुद्ध वाहे चंद्रु ॥ तरी सर्वथा भय नाहीं ॥ ३१ ॥ भलते ग्राम यात्रेसी जाय ॥ आपुलीया चंद्रातें पाहें ॥ सर्व सिद्धि होती कार्यें ॥ निर्विघ्न पैं ॥ ३२ ॥ चंद्रावरी कार्यें स्थिर ॥



सूर्य वाहातां कींजे क्रूर ॥ चंद्र सूर्य चाले एकसर ॥ तरी मौन्येंचि सुषुम्ना पैं ॥ ३३ ॥ शीघ्र कार्य ओढवलें ॥ जें वाहे तेंचि टाकावें पाउल ॥ चंद्राचें सम बोलिले ॥ सूर्याचें विषम ॥ ३४ ॥ जाणती ऐसें जाणावें ॥ जें चालें तें पाउल पुढें ठेवावें ॥ तरी सिद्धी होती स्वभावें ॥ सर्व निर्विघ्न पैं ॥ ३५ ॥ दिसतां सुषुम्ना संक्रमण ॥ तरी प्रवासीं न करावें गमन ॥ हानि मृत्यु दारुण ॥ होय तयाची ॥ ३६ ॥ चंद्र वाहतसे ॥ न जावे पूर्व उत्तर दिशे ॥ गेलिया प्राणहानि विशेषें ॥ होय तयासी ॥ ३७ ॥ वाहत असतां भास्करु ॥ पश्चिम दक्षिणे गमन नको करूं ॥ पुढें घात होय थोरूं ॥ जीवि-त्वासी ॥ ३८ ॥ सूर्य तिथि रवीचा वार ॥ जाय पूर्व उत्तर सूर्यावर ॥ तरी तयाचें फल निर्धार ॥ अलभ्य लाभ होती पैं ॥३९॥ चंद्र संपूर्ण वाहे ॥ पश्चिम दक्षिणेसि जाय ॥ तरी सर्व कामना पूर्ण होय ॥ सत्य सत्य पार्वती ॥ ४० ॥ हे युक्ति पूर्ण बोधु ॥ जाणे तोची अनादि सिध्दु ॥ निज नामा प्रसिध्दु ॥ गुरु

मुखें अनुभवावें ॥ ४१ ॥ कोणी एके प्रश्न केला ॥ सम अक्षरें बोलिला ॥ चंद्र वाहत असला ॥ तरी सर्वथा भय नाहीं ॥ ४२ ॥ विषम अक्षरें बोलिला ॥ सूर्य तेथें वाहिला ॥ सूर्य अंगीं बैसला ॥ तरी सर्व सिद्धी ॥ ४३ ॥ चंद्र वाहे बैसे चंद्राकडे ॥ समान अक्षर जरी घडे ॥ जिंके कळिकाळाचे हुडे ॥ सर्वथा भय नाहीं ॥ ४४ ॥ आणीक तेथील विचारू ॥ वाहतां चंद्र अथवा दिनकरू ॥ प्रश्नाचा होत उच्चारू ॥ रेचक पूरक पहावें ॥ ४५ ॥ रेचक प्रश्न करी निर्फळ ॥ पूरक प्रश्न करी सफळ ॥ हे युक्ति निर्मळ ॥ सम विषम जाणावी ॥ ४६ ॥ कुंभक त्राहाटक मध्यम ॥ प्रश्न तयाचा सम विषम ॥ रोगिया होत बहुत श्रम ॥ भय नसे तयासी ॥ ४७ ॥ हरपलें हरितलें ॥ अथवा देशांतरा गेलें ॥ रोगी व्याधियें पीडिलें ॥ पूर्णनाडी असे तरी सुफळ ॥ ४८ ॥ विपरीत अक्षरीं ॥ वाहतां प्रश्न करी ॥ तें संक्रमण पैं त्यापरी ॥ निर्मळ होय ॥ ४९ ॥ प्रश्न केला गरोदरीचा ॥ उदय देखिला चंद्राचा ॥



तरी कन्या होईल हे वाचा ॥ अन्यथा नाहीं ॥ ५० ॥ वाहात असतां भास्करु ॥ तरी होईल कुमरू ॥ हा न चुके निर्धारू ॥ शिव सांगे भवानीसीं ॥ ५१ ॥ शून्यस्थानीं पुसे ॥ तरी गर्भासि विघ्न असे ॥ संक्रमण दिसे ॥ तरी नपुंसक ॥ ५२ ॥ पुसतां शून्यस्थानीं होता ॥ तोचि पूर्वस्थानीं ये मागुता ॥ तरी जीवन्मुक्त होता ॥ गर्भासि त्या ॥५३॥ पूर्णस्थानीं प्रश्न करी ॥ तोचि शून्यस्थानीं ये जरी ॥ हें जाणावें निर्धारीं ॥ भय त्या गर्भासी ॥ ५४ ॥ प्रश्न करितां हातीं फळ ॥ अथवा फल कांहीं निर्मळ ॥ तरी तयासीं प्रांजळ ॥ सफळ होय ॥ ५५ ॥ ऐसें स्वरोदय ज्ञान जाणावें ॥ लाभालाभ विचारावे ॥ जय विजय पहावे ॥ शुभाशुभ सर्व कांहीं ॥ ॥ ५६ ॥ संग्रामाचे अवसरीं ॥ सूर्य वाहे जया शरीरीं ॥ तो जय पावें चराचरीं ॥ यशखड्ग सिद्धि येतसे ॥ ५७ ॥ दोघांचा सूर्य झुंजतां वाहे ॥ तेथें सामान्यता राहे ॥ जयाचा चंद्रमा वाहे ॥ हार पावे तोचि पैं ॥

॥ ५८ ॥ सूर्य वाहे तरी चालावें ॥ दिशा वार सांभाळावें ॥ संक्रमण
असे तरी न धरावे ॥ शस्त्र हातीं ॥ ५९ ॥ नवग्रहांचा भेद ॥ जाणावा
विविध ॥ नाडी माझी प्रसिद्ध ॥ मेषादिक राशी ॥ ६० ॥ मेष तूळ
कर्क मकर ॥ दक्षिण नाडीचा प्रसार ॥ वृषभ सिंह वृश्चिक कुंभ मनोहर ॥
हे वामनाडीश्वरीं जाणावे ॥ ६१ ॥ मिथुन कन्या धन मीन ॥ सुषुम्ना
नाडींत असती जाण ॥ बारा राशींचा गुण ॥ एवंविध ॥ ६२ ॥
आतां चंद्र सूर्यांचे माझारी ॥ सांगिजेल पांच तत्वांची परी ॥ हे युक्ति
निर्धारी ॥ भवानी तुज सांगतों ॥ ६३ ॥ आप तेज पृथ्वी आकाश वायो ॥
पांच तत्वांचा अन्वयो ॥ इडा पिंगळेंत पहा हो ॥ जाणते पुरुषीं ॥ ६४ ॥
ऊर्ध्व वाहे तो अग्नि ॥ अधोमुख जाण भवानी ॥ वायुतत्व वाहे दक्षिणी ॥
हें निरुतें जाणावें ॥ ६५ ॥ न लागे कवणिये स्थानीं ॥ तेचि ओळखिजे
धरणी ॥ आकाश सर्वस्थानीं ॥ व्यापूनि फांकतसे ॥ ६६ ॥ संपूर्ण



योगियांचा रावो ॥ ऐसे अभ्यासें स्वयमेव ॥ निजहृदयींची ठेव ॥ जाणेल
तो स्वरूपीं मिळे ॥ ६७ ॥ सूर्य वाहे रात्रीचे अवसरीं ॥ दिवा वाहे
चंद्राचौफेरी ॥ काय नवल गौरी ॥ तोचि एकमत्स्वरूप ॥ ६८ ॥ सकल
घडलीं तया पुण्यें ॥ दग्ध झालीं संचित क्रियमाणें ॥ प्रारब्ध दोष जळाले
पूर्ण ॥ त्याचें दर्शन वांछितसे ॥ ६९ ॥ देव ऋषी संत महंत ॥ निरंतर
हाचि सेवित ॥ चुके जन्म मृत्यु निश्चित ॥ अखंडित हे समाधि ॥ ७० ॥
अहं सोहं अनादि मंत्र ॥ सहा शतें एकविस सहस्र ॥ हृदयीं जपे तो
योगींद्र ॥ माथां मुकुट आमुचा ॥ ७१ ॥ संसारीं असतां प्राणी ॥ अखंडित
नामाची मिळणी ॥ सहज सांडोनि साधनीं ॥ फिरूं नये सर्वथा ॥ ७२ ॥
हृदयींचें निजगुज ॥ सांगितलें गौरी तुज ॥ सद्गुरुकृपें मुखें निजबीज ॥
विश्वासोनि राहावें ॥ ७३ ॥ नलगे करणें उरस्फोट ॥ नलगे हालवावा
ओंठ ॥ नाम अनिर्वाच्य निघोट ॥ येणें रीती असावें ॥ ७४ ॥ हें सकळ

कर्माचें कल्याण ॥ केलें तत्वांचें विवरण ॥ हें अनुभवें ज्याचें तो जाणे ॥ येर अविश्वासिया नकळे ॥ ७५ ॥ हें सकळ साधनांचें सार ॥ कोटि कुलाचा उद्धार ॥ जेणें चुके येरझार ॥ तें तुज म्यां निरोपिलें ॥ ७६ ॥ येथें अविश्वास धरिसी ॥ तरी प्राप्ती नाहीं निश्चयेसीं ॥ आणी जन्ममरणासी संख्या नाहीं ॥ ७७ ॥ अनन्यभावें सद्गुरूसीं ॥ कल्पनातीत अहर्निशीं ॥ सफल संभार तयासी ॥ तुज हें सत्य निरोपिलें ॥ ७८ ॥ सांगूं तत्वांचे गुण ॥ लाभालाभाचें लक्षण ॥ सर्व सिद्धींचें कारण ॥ घडे तयासी ॥ ७९ ॥ आपतत्व पुरुष ॥ पृथ्वी दिसे स्त्रीचा वेष ॥ आकाश नपुंसक निःशेष ॥ ऐसें जाणावें पैं ॥ ८० ॥ अग्नि वायो मध्यगती ॥ प्रश्न केला आपणाप्रती ॥ तरी तत्वकळा निगुती ॥ आपुली आपण पहावी ॥ ८१ ॥ कोणी ग्रामांतरा गेला ॥ स्त्री कां पुरुष देखिला ॥ आप देख तरी लांबला ॥ अग्नितत्वीं अस्ताव्यस्त तो ॥ ८२ ॥ पृथ्वी वाहे तरी उत्तर दिशे असे ॥




तेज वाहे तंव पूर्व दिसे ॥ वायो जर असे ॥ तरी पश्चिमेसी ॥ ८३ ॥ आकाशाचा प्रकाश झाला ॥ तंव देशांतरा गेला ॥ तो मागुता न भेटला ॥ संदेह नाहीं ॥ ८४ ॥ आप भेटे लाभेसी ॥ पृथ्वी लाभे बहुतां दिवसीं ॥ तेजीं लाभ नाहीं तयासी ॥ वायु असे भयासी ॥ आकाशीं मृत्यु सांगे ॥ ॥ ८५ ॥ धातु चिंतेचा विचार ॥ दिसे आपाचा विस्तार ॥ रूपें होय निर्धार ॥ पृथ्वी होय कनक पैं ॥ ८६ ॥ जरी तेज दिसे ॥ तरी होय तांबें कांसे ॥ वायुतत्वीं वीट दिसे ॥ आकाशीं दिसे लोह पैं ॥ ८७ ॥ साधकें किन्न साधेल ॥ ऐसा भेद जाणवेल ॥ पृथ्वी आपाचें प्रबळ ॥ सफळ निर्फळ चर पैं ॥ ८८ ॥ कवणतत्वीं कवण ग्रह असती ॥ ते सांगिजेल स्थिती ॥ मनासी आणि युक्तीसी ॥ जाणवती पैं ॥ ८९ ॥ सोम बुध बृहस्पती ॥ वामनाडींत असती ॥ कवण तत्वीं वर्तती ॥ ते परिसा पैं ॥ ९० ॥ आप तेजीं शुक्र ॥ वायुतत्वीं बुध गुरु ॥ पृथ्वीतत्वीं हे चारु ॥ ग्रह

जाणावे ॥ ९१ ॥ रवि राहु शनि मंगळ ॥ त्यांचा दक्षिण नाडींत खेळ ॥
वायुतत्वीं निर्मळ ॥ वास्तव्य तयांचें ॥ ९२ ॥ तत्वसुखाचा विस्तार ॥
शून्यापासाव निर्धार ॥ हा जाणावा विचार ॥ गुरुमुखें ॥ ९३ ॥
पांचतत्वीं तीन गुण ॥ शरीरीं असती पंचप्राण ॥ वाम दक्षिण नाडीपासून ॥
प्रकाश तयांचा ॥ ९४ ॥ अकार उकार मकार ॥ चवथा महाकारण
ओंकार ॥ अर्धमात्रा तो ईश्वर ॥ सर्वसाक्षी ॥ ९५ ॥ ओंकार हृदयभुवन ॥
अहं सोहं जाति सामावून ॥ सच्चिदानंद आपण ॥ स्वयंभूचि पैं ॥ ९६ ॥
स्वरूप अखंड दंडायमान ॥ तेथें उत्तरायण नाहीं दक्षिणायन ॥ देहीं असोनि-
विदेही जाण ॥ प्राप्त होय ॥ ९७ ॥ ऐसी निजनामीं जयांची वृत्ती ॥ ते
मत्स्वरूपीं सामावती ॥ जीत अंथरूनि मेले पांघुरती ॥ तेचि पावती कैला-
सपद ॥ ९८ ॥ हें पिंड ब्रह्मांड भूतात्मक ॥ जपती ज्ञानी उत्तम श्लोक ॥
हें गुह्य अलोलिक ॥ अनिर्वाच्य ॥ ९९ ॥ आतां पांचाचे पंचवीस गुण ॥



अस्थि त्वचा नाडी मांस पूर्ण ॥ पांचवे रोम हे पृथ्वीपासून ॥ उत्पन्न झाले ॥
॥ १०० ॥ लाळ मूत्र रक्त शोणित ॥ स्वदेह आपापासाव निर्मित ॥
चलन वलन धावन प्रसरण ॥ अकोचन वायुपासूनि निर्माण पैं ॥ १ ॥
क्षुधा तृषा आलस्य निद्रा मैथुन ॥ हे आपाचे पांच गुण ॥ काम क्रोध लोभ
मोह भय जाण ॥ हे आकाशापासाव ॥ २ ॥ रेचक पूरक कुंभक ॥
त्राहाटक धनंजय देख ॥ अनुभव करिती मनें एक ॥ ते धन्य संसारी ॥ ३ ॥
वश करावें अकोचनें ॥ हें रेचकाचें कारण ॥ मंगलदायक कार्य करणें ॥
हें कुंभकें करावें ॥ ४ ॥ कुंभक साधिता ॥ विज्ञान साधी तत्वा ॥ महा-
पातकांची कथा ॥ कायसी तेथें ॥ ५ ॥ कुंभक करी अजरामर ॥ वश्य
आकर्षण पूरकेश्वर ॥ स्तंभन उच्चाटन द्वेष थोर ॥ रेचकें शुभाशुभ आचरावें
॥ ६ ॥ एकांतविध कामिकाजनीं ॥ ऋतुकाळीं पूरकें करूनी ॥ स्त्रीचें नाम
अंतःकरणीं ॥ सात वेळां जपावें ॥ ७ ॥ चंद्रावरी पूरकें सात वेळ ॥ पुनरपि

रेचकें बळें ॥ मग कुंभकें बारा वेळ ॥ स्मरण या रीती कीजे ॥ ८ ॥ ते स्त्री वश्य होय ॥ ते जीवंता आणिकाचें तोंड न पाहे ॥ कळा जाणावी हे ॥ कामिक जनीं ॥ ९ ॥ नातरी उदय झाला सूर्याचा ॥ वेचूनि कड उदय करी चंद्राचा ॥ मोह भेद कुंभकाचा ॥ प्राणि चौदा वेळ जपावा ॥ ११० ॥ इडा ईडेश्वरी मंत्रुनी ॥ विडा द्यावा कामुक जनीं ॥ स्त्री वश्य होय तत्क्षणीं ॥ काम तत्व हें ॥ ११ ॥ चंद्राचा उदय ॥ रेचूनि उभा करी सूर्य ॥ पुरुष नाम जपतां वश्य होय ॥ अर्धक्षण न लागतां ॥ १२ ॥ पुरुष स्त्रीशीं वश्य होती ॥ आणिका स्त्रीसीं न पाहाती ॥ दोघांसी चाले प्रीती ॥ देह असे तोंवरी ॥ १३ ॥ असो स्त्रियांची बहु संगती ॥ बिंदु न द्यावा कामिनीप्रती ॥ भोगोनि अभोग हे युक्ति ॥ विरळा जाणे ॥ १४ ॥ हें वर्म श्रीकृष्ण जाणे ॥ सोळा सहस्र भोगिल्या जेणें ॥ ऊर्ध्वरेता ब्रह्मचर्यपण ॥ न मोडे तयाचें ॥ १५ ॥ साठही सहस्र खंडी अन्न ॥ निराहारी दुर्वास जेऊन ॥ गोत्रहत्या करी अर्जुन



करूनि पातक नसे तया ॥ १६ ॥ योगियांची जीवनकळा ॥ आत्मसुखाचा सोहळा ॥ सद्गुरु दाखविती डोळां ॥ तरी सार्थक जन्माचें ॥ १७ ॥ जयाचें अनंतजन्मींचें सुकृत ॥ तयासी हें वर्म होय प्राप्त ॥ आणिक तया दर्शनें बहुत ॥ तरती प्राणी ॥ १८ ॥ काय करावा थोर पाल्हाळ ॥ अष्टमा सिद्धींचें फळ ॥ इडा पिंगळा केवळ ॥ साध्य होय साधकासी ॥ १९ ॥ त्राहाटक धनंजयासी ॥ धरीतां दोरी तुटली आकाशीं ॥ वाम त्राहाटक धनंजयासी ॥ वाम दक्षिण नाडी परीयेसी ॥ असे खेळ तयांचा ॥ १२० ॥ इडा पिंगळा दोन वाटा ॥ पोहोंचविती दहावे दारवंटा ॥ स्वसुखा समाधी वरवंटा ॥ संसारीं असोनि भोगिती ॥ २१ ॥ अगा सद्गुरुचे पायीं ॥ लीन व्हावें ठायीं ठायीं ॥ मोक्ष लोळे तयाचे पायीं ॥ मुक्ती चारी दासी त्याच्या ॥ २२ ॥ उंच नीच देह धरीला ॥ ब्रह्मसाक्षात्कार तयासी झाला ॥ ब्रह्मादिक तयाला ॥ सामोरा येती ॥ २३ ॥ ब्रह्म अखंड दंडायमान ॥

सर्वांठायीं व्यापक पूर्ण ॥ हा अनुभवो जया तो जाणे ॥ येरांस टकमक ॥
॥ २४ ॥ स्वरूपाची व्हावया प्राप्ती ॥ अभ्यास करावा निगुती ॥ अभ्या-
साची प्रथम निगुती ॥ ऐसी आहे जाण पैं ॥ २५॥ मुख नासिक नयन ॥
आणिक दोन्ही श्रवण ॥ दोन्हीं हातांच्या अंगुल्या कीजे निरोधन ॥ स्थान-
स्थकीं ॥ २६ ॥ ऐसें साधकें करावें ॥ भ्रूमध्य लक्ष द्यावें ॥ नित्यनेमें
अनुभवावें ॥ श्रीसद्गुरुकृपें ॥ २७ ॥ हें षड्मुद्रा साधन ॥ येणेंचि होय
ब्रह्मसनातन ॥ घडे तया जन्ममरण ॥ आपला आपण भोगितो ॥ २८ ॥
असोनियां ग्रहाश्रमीं ॥ लक्ष तयांचें परब्रह्मीं ॥ तोचि परब्रह्माचा स्वामी ॥
सत्य सत्य त्रिवाचा ॥ २९ ॥ तयासी जप तप व्रत ॥ आणिक नियमादिक
तीर्थ ॥ हें आमचें कुळदैवत ॥ हृदयमंदिरीं पूजितसे ॥ १३० ॥ हे गुरुगम्य
नेणती ॥ साधुत्वें वरपंगी डोलती ॥ तया न चुके यातायाती ॥ यमदंड गर्भ-
वास ॥ ३१ ॥ आपुलीया देहाचा उद्धार ॥ जेथें होय परब्रह्म साक्षात्कार ॥



तयाचे चरणीं वारंवार ॥ लीन व्हावें भाविकें ॥ ३२ ॥ उत्तम योनी असोनि
पाहीं ॥ साधन करावें लवलाहीं ॥ आळस करूं नये विषयीं ॥ जाणति
या पुरुषीं ॥ ३३ ॥ तुम्हां जाणतियांप्रती ॥ हेचि विनवणी पुढती ॥
सोहं शब्द हृदयाप्रती ॥ सहजस्थिती असावी ॥ ३४ ॥ आतां ऐकोनि करा
विचार ॥ पुढिल चिन्हें ओळखा निर्धार ॥ तयाचा पाहे चमत्कार ॥
मनासि आणि ॥ ३५ ॥ शुद्धपक्ष चंद्राचा ॥ कृष्णपक्ष रवीचा ॥ तीन
दिवस एक एकाचा ॥ अमावास्या प्रतिपदेपासोनी ॥ ३६ ॥ शुक्लपक्षींचें
तिथीसी चंद्र ॥ असतां सुख अपार ॥ कृष्णपक्षींचे तिथीसी दिनकर ॥
तो आनंद योगियां ॥ ३७ ॥ शुक्लपक्षीं कृष्णपक्षीं पाहतां ॥ सुषुम्ना दिसे
अवचिता ॥ उपाय ते अपाय तत्वतां ॥ न चुके आघात पैं ॥ ३८ ॥ तरी
जीवासी होती कष्ट ॥ अपाय लागती पाठोपाठ ॥ अशा पाल्हाळाची खट-
पट ॥ काय व्यर्थ सांगों मी ॥ ३९ ॥ परी किंचित सांगों तयाचें गुण ॥

होये देहाची हाण ॥ विप्रित सुप्रित वाहे पूर्ण ॥ तयाचें फळ ऐसें आहे ॥
॥ १४० ॥ संक्रमण सुषुम्ना तरी होय ॥ तरी घराची न होय सोय ॥ स्त्री
मृत्यु कीं अपत्या भय ॥ यांत संदेह नाहीं ॥ ४१ ॥ क्षणक्षणा उलट पालट ॥
आक्रोश राजपीडा सांगे वोखट ॥ विनालाभ उत्कृष्ट ॥ दुर्भिक्ष व्याधीं
भूमिकंप होय ॥ ४२ ॥ साधकें प्रातःकाळीं पहातां ॥ विपरीत दिसेल
क्षिता ॥ श्रीसद्गुरुचरण चिंतितां ॥ महारिष्टें नासती ॥ ४३ ॥ ज्ञानियाचें
ज्ञान ॥ सर्व ऋषींचें साधन ॥ जें जें उपदेशिलें जाण ॥ भवानीशीं शंकरें
॥ ४४ ॥ आतां संवत्सराचा वर्तारा ॥ मज सांगिजे दातारा ॥ सुख दुःख
भोगावें शरीरा ॥ किं निमित्य स्वामियां ॥ ४५ ॥ फाल्गुन शुद्ध नवमी ॥
आरंभ प्रतिपदेपासोनि ॥ उदय चंद्राचा अस्तमानीं ॥ रवि उदय होय
॥ ४६ ॥ तें सांगता सुफळ ॥ कुटुंब मित्रादि सकळ ॥ अलाभलाभ मंगळ- ॥
दायक तया घडती ॥ ४७ ॥ चैत्र शुद्ध तीन दिवस वाहे ॥ चंद्र तरी



चंद्राष्टक फळ होय ॥ दुःख उद्योग जाय ॥ जीवे तोंपर्यंत ॥ ४८ ॥ अथवा
प्रभातीं भानु असे ॥ अस्तमानीं चंद्र दिसे ॥ तें वोखटें जाणावें ऐसें ॥
वैरियासी सफळ ॥ ४९ ॥ तें सांगे उद्योग मरण ॥ विनाश राजिक पीडा
दारुण ॥ राजियासीं आघात मरण ॥ दुष्ट फळ ॥ १५० ॥ अथवा वाहे
संक्रमण ॥ विपरीत पीडा होय दारुण ॥ हानि मृत्यु आक्रोशन ॥ देहपीडा
सांगे ॥ ५१ ॥ चैत्र शुद्ध पहिले प्रहरा ॥ वाहे सूर्याचा होरा ॥ दुसरे तिसरे
दिवशीं अवधारा ॥ प्राणांतिक अथवा जाणिजे ॥ ५२ ॥ चौथे प्रहरीं वाहे
सूर्य ॥ न घडे चिंतिलें कार्य ॥ तीन दिवस पिंगला वाहे ॥ तीन वर्षां मरणां-
तक ॥ ५३ ॥ सूर्य वाहे सात दिवस ॥ तरी मृत्यु राहे सहामास ॥ अथवा
वाहे दश दिवस ॥ तरी मृत्यु राहे समयो कीं ॥ ५४ ॥ अकरा दिवस
चंद्र वाहे ॥ तरी एकवीस दिवशीं घात आहे ॥ ऐसें सर्व जाणोनि भजनीं
राहे ॥ त्यासि अपाय घडेना ॥ ५५ ॥ स्वर वाहे दिवस बारा ॥ तरी

जाणावें सादिवसां खरा ॥ एकविस दिवस चाले होरा ॥ तरी तेच दिवशीं मृत्यु होय ॥ ५६ ॥ दिवस रजनीं चंद्र वाहे ॥ तरी चंद्राष्टक फळ लाहे ॥ चिंता उद्योग जाय ॥ संदेह नाहीं ॥ ५७ ॥ तीन दिवस रजनीं सूर्य वाहे ॥ क्षत्री मोडती महाभय ॥ अथवा तीन दिवस रजनीं संक्रमण वाहे ॥ तरी उद्योगहानी मृत्युपीडा ॥ ५८ ॥ तीन दिवस रजनी अस्ताव्यस्त चाले ॥ युक्ति खुंटली परचक्र आले ॥ देशांतरा गमन करितां भले ॥ कांहींसा तरणोपाय ॥ ५९ ॥ आणि शुक्लपक्षीं चंद्र वाहतसे ॥ आणि दोन दिवस नसे ॥ तरी चार मास शुभ असे ॥ जाणावी परीक्षा ॥ १६० ॥ चतुर्दशी आणि अमावास्या ॥ चंद्र वाहे श्वासा ॥ तरी अष्टमास संतोषा ॥ चंद्राष्टक फळ शुभ ॥ ६१ ॥ ऐसी चंद्राची कुसरी ॥ विश्वउपकारालागीं त्रिपुरारी ॥ सांगितलेंसें गौरी ॥ श्रीगुरुगम्य हें ॥ ६२ ॥ आतां सूर्याचे फळराशी ॥ ह्या युक्ती परियेसी ॥ परीक्षा याची तीन दिवशीं ॥ वर्तोळा पुरुषाचा ॥



॥ ६३ ॥ चैत्र शुद्ध एक संवत्सर पहावा ॥ तरी चार मास दुष्ट ओळखावा ॥ अष्टमास बरवा ॥ ओळखावा ज्ञानवंतें ॥ ६४ ॥ तीन दिवस वाहे तरी वरिस ॥ ऐसा भेद सुरस ॥ साधकीं साधावयास ॥ आणिक कांहीं न करावें ॥ ६५ ॥ सुषुम्ना संक्रमण केवळ ॥ सुख नसे दुःखाचें भांडवल ॥ केवळ अनर्थाचें मूळ ॥ ओळखिजे ॥ ६६ ॥ जयाचें अंतःकरण निर्मळ ॥ तोचि साधी हेंचि फळ ॥ तयासी ओळंगती सकळ ॥ अष्टमा सिद्धि ॥ ६७ ॥ जैसें असे या पिंडीं ॥ तैसें वर्ते ब्रह्मांडीं ॥ तेथें अज्ञान काळाची उडी ॥ ओळखिजे ज्ञानियें ॥ ६८ ॥ इडा पिंगळांचे पोटांत ॥ पृथ्वी आप दिसे सुख संमत ॥ तेज आकाश उठत ॥ शोक उपजे जीवासी ॥ ६९ ॥ वायुतत्वीं भय राजकी जाण ॥ आकाश हो तंव मरण ॥ चैत्र शुद्ध प्रथम तीन दिवस जाण ॥ साधकजन जाणताती ॥ १७० ॥ देह धारकासी सुगम ॥ एकवीस सहस्र सहाशतें नेम ॥ हें जाणावें वर्म ॥ श्रीसद्गुरुमुखें ॥ ७१ ॥ ऐसें आरंभीं शुक्ल किंवा कृष्ण ॥ दिवस रजनी तीन ॥ चंद्र सूर्य तथा संक्रमण ॥ ओळखावी

खुण साधुजनीं ॥ ७२ ॥ या युक्ती पांच तत्वें ॥ शुभ अशुभ वर्तती निश्चि-
तार्थें ॥ साधकीं जाणावें मनांत ॥ यथा अनुक्रमें ॥ ७३ ॥ हृदयीं अखंड
माळा ॥ सोहं शब्द सामावला ॥ नसे रिघ कळिकाळा ॥ योगियाचा बाप
तो ॥ ७४ ॥ असोनि संसारिं हेचि युक्ती ॥ नामघोषें डोलती ॥ सद्गुरूसीं
धरिती प्रीती ॥ अनन्यभावें ॥ ७५ ॥ आतां सद्गुरु हो कां भलते याती ॥
जेणें फेडिली आपुली भ्रांती ॥ तया ब्रह्मचि केवळ भाविती ॥ तोचि सच्छिष्य
॥ ७६ ॥ या नांव ब्रह्मरूप सुगम ॥ नामीं हृदयीं अखंड नाम ॥
सकळही घडे नेम ॥ तया साधकासी ॥ ७७ ॥ नरदेहीं सुगम उपाय ॥
अजपीं धरी सोय ॥ तोचि नर नारायण होय ॥ उलटोनि पाहतां ॥ ७८ ॥
चंद्र उदय होतां घेइजे ॥ षोडश वेळा घट कीजे ॥ सान सान सोडिजे ॥
दक्षिणमार्गें ॥ ७९ ॥ ऐसियापरी ध्यान करावें ॥ अखंड एकरूप असावें ॥
हृदयीं सोहं सांठवावें ॥ साधकेश्वरीं ॥ १८० ॥ त्रिबंध राखावें वोजा ॥
षण्मुख समुद्राची पैंजा ॥ साम्र सर्वसिद्धींचा राजा ॥ ब्रह्मरूप तोचि पैं ॥



॥ ८१ ॥ सोहं सामावे चौथे शून्यीं ॥ येथें उठती अनुहत ध्वनी ॥ संसारीं
ब्रह्मरूप प्राणी ॥ असोनि जीवन्मुक्त ॥ ८२ ॥ ऐसें अनिर्वाच्य सुखें ॥
ओळखावें सद्गुरुमुखें ॥ जनीं वनीं निमिषें निमिषें ॥ जप तप असावें
मनोमय ॥ ८३ ॥ जे वस्तु परात्पर ॥ व्यापक असे निरंतर ॥ हितगुज
हिमनगकुमरें ॥ तुजप्रती निवेदिलें ॥ ८४ ॥ ऐकोनि मिठी घातली चरणीं ॥
झाली उन्मीलित लोचनीं ॥ म्हणे स्वामी तुमची वाणी ॥ सार्थ झालें
उभय लोकीं ॥ ८५ ॥ म्हणे ब्रह्मानंदीं बुडालें ॥ निजनाम सुखें सुखावलें ॥
देहीं असोनि विदेहीं केलें ॥ श्रीभोळानाथा तूं ॥ ८६ ॥ आतां जो लक्ष
पिंडीं ॥ तोचि बोलिजे ब्रह्मांडीं ॥ तेथें काळाची मोडोनि नरडी ॥ येणें
अभ्यासें राहतां ॥ ८७ ॥ आतां ऋतुकाळ समय वार्ता ॥ पार्वती प्रश्न करी
तत्वता ॥ भोगकाळ समय त्वरिता ॥ साधकें कैसा साधावा ॥ ८८ ॥
पुरुषासी पूर्ण सूर्य वाहे ॥ स्त्रियेसी चंद्र तैसाचि आहे ॥ तरी पुत्राचा गर्भ
निश्चये ॥ राहे मातेचे उदरीं ॥ ८९ ॥ सद्गुरुलक्षण पुत्रासी ॥ धन धान्य पूर्ण

लक्ष्मीसी ॥ अष्टमासिद्धि वोळंगती दासी ॥ संदेह नाहीं ॥ १९० ॥
पुरुषासीं चंद्र वाहे ॥ स्त्रियेसीं सूर्य होय ॥ तरी कन्येचा गर्भ होय ॥ जननीये
गर्भ पोटीं ॥ ९१ ॥ पुरुषासि वाहे संक्रमण ॥ स्त्रियेसीं सूर्य पूर्ण ॥ तेणें होय
गर्भपतन ॥ हा विस्तार नकळे ॥ ९२ ॥ स्त्रीसी वाहे संक्रमण ॥ पुरुषासि
सूर्य पूर्ण ॥ तरी पुत्र नपुसंक हे खूण ॥ असत्य नोहे ॥ ९३ ॥ दोघांसीं वाहे
संक्रमण ॥ भगना लिंग गर्भाकारणें ॥ अल्पायुषी परिक्षा गहन ॥ न वांचे
सर्वथा ॥ ९४ ॥ दोघां सूर्य जरी चाले ॥ दोघां चंद्र वियोग बळें ॥ दोघां
संक्रमण तरी सकळें ॥ व्याधि रोगाचें भय फार ॥ ९५ ॥ संक्रमणाचें
बळें ॥ आप तेजें होतीं दरिद्री बाळें ॥ उपजतांचि सुषुम्ना मुलें ॥ भिकेसी
लाविती मायबाप ॥ ९६ ॥ ज्ञाते पुरुषांसि सांगती विचार ॥ स्त्रियेसी
मोहन वशीकर ॥ होय ऐसा निर्धार ॥ तेही सांगूं पार्वती ॥ ९७ ॥ स्त्रीवशी-
करण आणि मोहन ॥ जेव्हां उडतो मदन ॥ ते वेळें पुरुषें करावें कारण ॥
तें अवधारिजे ॥ ९८ ॥ शिश्नाचें काढावें रेत ॥ सूर्यकिरणें चुना करी मिश्रित ॥




सोम शुक्र बुधेंसी विडा द्यावा निश्चित ॥ वश्य होय संशय नाहीं ॥ ९९ ॥
मग टाळूसीं रेत मर्दावें ॥ आणि नाभीसी पुसावें ॥ ऐसेपरी मोहावें ॥ स्त्री
देहा ॥ २०० ॥ अथवा चंद्र वाहत असे ॥ स्त्री नाम घेवोनि सूर्यातें सोसे ॥
तरी वश्य होय निःशेष ॥ अन्यथा नाहीं ॥ १ ॥ पुरुष वश्य करणें ॥ सूर्य
वाहे कीजे मैथुन ॥ सूर्यवारीं चुना लाऊन ॥ पुरुषा विडा देईजे वश्य होय ॥
॥ २ ॥ अथवा पुरुषाचा सूर्य चंद्र सोसिजे ॥ किंवा सूर्य चंद्रांत आणिजे ॥
हे अपले आंत धरिजे ॥ साधकेश्वरें ॥ ३ ॥ ऐसीं स्त्री पुरुष वश्य करणें ॥
चंद्र सूर्य कार्य साधणें ॥ तरी स्त्री पुरुषा पडे मोहन ॥ सत्य जाण शुभानने ॥
॥ ४ ॥ मुखीं श्वास मुखें घेईजे ॥ वरचेवर अंग राखिजे ॥ तियेचे अंगींचा
स्वेद लागों न दीजे ॥ पुरुषें आपुले आंगासी ॥ ५ ॥ स्मरोनि श्रीगुरूचे
चरण ॥ कळावयासी जिणें मरण ॥ निश्चळ कीजे अंतःकरण ॥ योगयुक्त
ऐक पैं ॥ ६ ॥ शुचिर्भूत होवोनी ॥ बैसावें पद्मासनीं ॥ जिकडे पडेल
आपुली साउली धरणीं ॥ तिकडे बैसावें ॥ ७ ॥ कंठनाळाची साउली पडेल

जेथें ॥ दृष्टी लक्षावी तेथें ॥ अवलोकावें आकाशातें ॥ तंव छाया पुरुष देखिजे ॥ ८ ॥ ऐसा अभ्यास प्रति दिवसीं ॥ करितां जें सुख देखसी ॥ सिद्धी होईल अहर्निशीं ॥ मग देखसी अवगुण ॥ ९ ॥ हें छायापुरुषाचें ज्ञान ॥ जे करिती साधुजन ॥ लक्ष लावितां आप आपण ॥ अनुभवासी येतसे ॥ २१० ॥ छाया पुरुषातें लक्षितां ॥ चिह्नें देखसी भविष्यार्थता ॥ जिण्या मरणाची वार्ता ॥ कळों येतसे ॥ ११ ॥ तेचि दीक्षा जाणावी ॥ श्वेतच्छाया दिसे बरवी ॥ तरी एक मास सुफळ दावी ॥ सकळ कार्य होतसे ॥ १२ ॥ कृष्णवर्ण दिसे तरी भय ॥ नीळवर्ण पीतवर्ण अपाय ॥ पंचवर्ण दिसतां छायानाश ॥ आरक्तता युद्ध पैं ॥ १३ ॥ दिसे श्वेतवर्ण पुरुष ॥ तरी राज्य लक्ष्मी जोडे यश ॥ अष्ट महासिद्धी जोडे त्यास ॥ संदेह नाहीं ॥ १४ ॥ चरण हीन पुरुष देखिला ॥ तंव अपमृत्यु पातला ॥ ऐसी सर्व जाणावी कळा ॥ तीन मासां पैं ॥ १५ ॥ मांड्या दृष्टी न पडतां ॥ तरी एक मास मृत्यु तत्वतां ॥ दोन्ही बाहु न दिसतां ॥ तरी शांति करावी ॥ १६ ॥ जरी न दिसे शिरकमळ ॥



एक मासांत होय काळ ॥ स्मरोनियां जाश्वनीळ ॥ ययासनीं बैसावें ॥ १७ ॥ जे जाणती साधक उत्तम ॥ त्याचा निरसे भवभ्रम ॥ होय पुरुष मंगळ धाम ॥ स्वस्वरूपीं निरंतर ॥ १८ ॥ सद्गुरूतें पूजावें ॥ हृदयीं नाम जपावें ॥ वाचेसी उच्चारावें ॥ शिव षडक्षर मंत्र ॥ १९ ॥ आणिक देहाची खुण ॥ वाम हस्त मस्तकीं ठेवून ॥ भ्रूमध्य लक्ष द्यावें पूर्ण ॥ हस्त न दिसे तरी बरवें नसे ॥ २२० ॥ बुबुळ डोळ्यांचें चेपिजे ॥ लाल फूल देखिजे ॥ तरी महासुख पाविजे ॥ तेथील परीक्षा ॥ २१ ॥ काळें फूल दिसेल अंधक ॥ तें सांगे सुखदुःख ॥ देहासि होईल आवश्यक ॥ ऐसें आहे या देहीं ॥ २२ ॥ अंग कांपे थरथरां ॥ ज्योतीचा दिसे पसारा ॥ पाहतां पडे अंधकारा ॥ श्रीसांबातें चिंतावें ॥ २३ ॥ अनुहात न ऐकतां श्रवणीं ॥ नासाग्र न दिसे नयनीं ॥ तरी रामकृष्ण स्मरावे ॥ २४ ॥ काळे दांत काळे शरीर ॥ दृष्टी पडे भ्यासुर ॥ तैं जाणावें साधकेश्वर ॥ तया बोलावणें यमाचें ॥ २५ ॥ पापणी आणि मनगटें ॥ धरिला केंश उपटे ॥ भंवईतळीं

रेखादाट ॥ तंव जाणावी यमकृपा ॥ २६ ॥ संपूर्ण चाले सूर्यगती ॥ वाम हारपे निशागती ॥ तैं पंधरा दिवसां मोक्षगती ॥ हरिस्मरणीं लागावें ॥ २७ ॥ बाहेर शरीर थंड दिसे ॥ अंतरीं दाह असे ॥ तरी जावें ऐसें ॥ यमलोकीं जाणें पैं ॥ २८ ॥ छाया पुरुषांचें ज्ञान ॥ श्रीशंकर स्वमुखें आपण ॥ साधक पुरुषें युक्ति पूर्ण ॥ येणें रीतीं पहावें ॥ २९ ॥ आतां निमिषो निमिषाचें अर्द्ध ॥ स्वरूपीं चित्त होय सावध ॥ तरी पातक राशी होती दग्ध ॥ तया साधकाच्या ॥ २३० ॥ भ्रूभंगावरूनि देख ॥ उभयपातीं करूनि एक ॥ निमिषपातीं राख ॥ व्योमगर्भींचे ठायीं ॥ ३१ ॥ मयूर पंखावरील डोळे ॥ तैसे दिसती वर्तुळें ॥ तयामध्यें जें निळें ॥ तें निखळ स्वरूप माझें ॥ ३२ ॥ तयांत राहे मनाची दृष्टी ॥ अहं सोहंची पडे मिठी ॥ यापरतें गोरटी ॥ सांगावया उरले नाहीं ॥ ३३ ॥ तया साधकाचें कल्याण ॥ स्वयंभ सदोदित पूर्ण ॥ तोचि आत्मा चैतन्यघन ॥ होऊनि राहे निरंतर ॥ ३४ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी ॥ जेथें




निवर्तल्या वाचा चारी ॥ तें सुख निर्धारीं ॥ तुझें तुजपुढें ॥ ३५ ॥ हें गौप्य करावें शास्त्र ॥ कळों न द्यावें अणुमात्र ॥ भाविक विश्वासुक नर ॥ तयासी निजगुज बोलिजे ॥ ३६ ॥ हा महावाक्याचा उपदेश ॥ त्वंपद तत्पद असिपद ॥ एक वास सहस्र सहा शत ॥ गुरु सांप्रदायी जाणती ॥ ॥ ३७ ॥ सगुण भजावें प्रेमेंकरून ॥ निर्गुण चिंतावें मनोमय ध्यान ॥ जनीं असोनि जनार्दन ॥ हृदयमंदिरीं स्मरावें ॥ ३८ ॥ तयासारिखें वर्तावें ॥ आपुलें अंतरींचें कळों द्यावें ॥ संसारीं असोनि ब्रह्म व्हावें ॥ येणें रीतीं राहतां ॥ ३९ ॥ हा पवन विजय ग्रंथ थोर ॥ राहिला बारा तिर्थींचा विचार ॥ तो सांगों सविस्तर ॥ अनुक्रमें करोनि ॥ २४० ॥ रविवारींचा होरा ॥ तयामागें मंगळ अवधारा ॥ विवाहालागीं बरा ॥ मंगळदायक ॥ ४१ ॥ शुक्र आणि बुधाचा होरा ॥ गुरुशिष्य दीक्षेसी बरा ॥ हें जाणिजे अवधारा ॥ जाणते पुरुषीं ॥ ४२ ॥ बुधामागें सोम ॥ तो सर्वांसी सम ॥ तो न ये कारणासी उत्तम ॥ क्रूर कार्या

योजावा ॥ ४३ ॥ सोमामागें शनी ॥ सर्व कार्यांची हानी ॥ निर्फळ होउनी ॥ जाय देख ॥ ४४ ॥ शनिमागें गुरु ॥ मंगळदायक निर्धारू ॥ सर्व सिद्धीचा आधारू ॥ साधकांसी ॥ ४५ ॥ गुरुमागें मंगळ ॥ सर्व कार्यांचा काळ ॥ अपघात होण्यासी नलगे वेळ ॥ बरवा न दिसे ॥ ४६ ॥ ऐसा दिवसाचा होरा ॥ हें ज्ञान साधकेश्वरा ॥ साधावें चतुरा ॥ सिद्ध पुरुषीं ॥ ॥४७॥ याची चाल अडचा घटिकांची ॥ हे खूण साधका ओळख होण्याची ॥ तेथें सुख दुःख होण्याची ॥ ओळख होईल ॥ ४८ ॥ गुरु शुक्र महा लाभ ॥ शीत सोम बुध ॥ मंगळ दुःखदायक ॥ लाभ घेतला नाहीं ॥ ४९ ॥ रवि घेतला क्रूर कार्या ॥ असे तो महा बळिया ॥ घेईजे साधावया ॥ युक्तिसार ॥ २५० ॥ गुरुर्विवाहे गमनेच शुक्रे ज्ञाने बुधे सर्व कार्येषु चंद्रे ॥ कुजेच युद्धं रविराज सेवा मंदेच वित्तं इति होरवारः ॥ ५१ ॥ ऋतुभाग संभवतां ॥ पुसे कन्या पर्वता ॥ पवन बंधु गुरुगम्यता ॥ पार्वतीप्रती ॥ ५१ ॥ प्रतिपदेस संभव सर्वहो न ॥ आत्मबुद्धी बीजेसि धारण ॥ तिजेचा संभवे



भिकारी पूर्ण ॥ चौथीचा संभवे परद्वारी ॥ ५२ ॥ परोपकारी पंचमीचा ॥ व्यवहारि संभवे षष्ठीचा ॥ सप्तमी तैसाचि अष्टमीचा ॥ दरिद्री जाणा गुरुमुखें ॥ ५३ ॥ नवमीचा भोळा भाग्यवंत ॥ दशमी संभवे दशगुणयुक्त ॥ एकादशीचा श्रीहरीभक्त ॥ तत्वज्ञानी ॥ ५४ ॥ द्वादशीचा संभवे गुरु ज्ञानी ॥ त्रयोदशीचा क्षत्रीय जाणा ॥ चतुर्दशीचा शहाणा ॥ पूर्णिमेचा अविश्वासि चोर पैं ॥ ५५ ॥ एका मासाचे सोळा ऋतु ॥ त्यामाजी वेगळाले गुण असतु ॥ ऐसे बीज संभवतु ॥ प्रारब्धें संभवे ॥ ५६ ॥ जैसी प्रारब्धाची उभारी ॥ तैसी बुद्धी उपजे शरीरीं ॥ तो नेम घडे शरीरीं ॥ निर्धारीं संदेह नाहीं ॥ ५७ ॥ हाचि प्रारब्धाचा निर्धार ॥ तिथि नक्षत्र योग वार ॥ हा जाणिजे तत्वविचार ॥ योगज्ञानी ॥ ५८ ॥ स्तवनं वोंकारश्च ॥ त्रिशून्यं पंचदेवता ॥ पंचेंद्रिय कुटुंबश्च ॥ यत्र आत्मा तव ग्रहा ॥ ५९ ॥ इडा च ब्रह्मरूपेण ॥ पिंगला विश्वरूपिणी ॥ सुषुम्ना रुद्ररूपेण ॥ सोहं हंसः स्वरूपता ॥ २६० ॥ इडा गंगा ती बोलिजे ॥ पिंगला यमुना नदी ॥ मध्यें

सरस्वती विद्या ॥ प्रयागादि समस्त हे ॥ ६१ ॥ अजपा गायत्री अव्यक्त ॥ योगियांसी मोक्षदायक ॥ हृदयीं पठण कीजे नित्य ॥ तयासी पुनर्जन्म नाहीं ॥ ६२ ॥ हिमनगें पंचतत्वांचें वर्णन ॥ आतां ओळखें ऐसी खुण ॥ पृथ्वी तत्व पीतवर्ण ॥ आप तत्व श्वेत पैं ॥ ६३ ॥ तेज तत्व वर्ण रक्त ॥ वायु नीळवर्ण असत ॥ आकाश काळें दिसत ॥ हे पंचवर्गांचीं भुतें पैं ॥ ॥ ६४ ॥ आतां सत्व रज सांगूं तिखट ॥ पृथ्वी मधुर आप खारट ॥ वायु आंबट आकाश कडवट ॥ जाणिजे पैं ॥ ६५ ॥ घरद्वाराची रुची ॥ सांगूं पंच भूतांची ॥ ललाटीं वस्ती आपाची ॥ आहार मैथुन तयाचा ॥ ६६ ॥ तेजाचे घर तळीं ॥ मुख नेत्र न्याहाळी ॥ आहार रूप न्याहाळी ॥ देखणें पाहे ॥ ६७ ॥ वायुचें घर फोंस ॥ मुख जाणा नासिक ॥ आहार तयाचा ऐक ॥ परिमळ सुगंध पैं ॥ ६८ ॥ नाभी पृथ्वीचें घर ॥ मुख द्वार आहार ॥ नाना षड्रस मधुर ॥ रुची घेतसे ॥ ६९ ॥ काळीज आकाशाचें घर ॥ मुख श्रोत्र आहार ॥ शब्द कुशब्द अपार ॥ श्रवण करी ॥ २७० ॥ प्रश्न पुसे



पार्वती ॥ हे कैसे अनुभवा येती ॥ कैसी काय त्यांची रीती ॥ तें मज निरोपावें ॥ ७१ ॥ शंभु म्हणे ऐक गिरिजे ॥ कांशाचा आरसा कीजे ॥ उठोनि त्यावरी श्वास सोडिजे ॥ वर्ण उमटे तत्वांचा ॥ ७२ ॥ तथा दुसरा एक प्रश्न ॥ हाताचें मनगट मुखावरी ठेऊन ॥ तळहातावरी सोडावा पवन ॥ ते तत्व खुण ओळखी ॥ ७३ ॥ तळहातांमध्यें पवन जिरे ॥ तरी पृथ्वी जाणावी चतुरें ॥ कोंपराकडे वायु सरे ॥ तें आपतत्व ओळखी ॥ ७४ ॥ आकाश वायु अंगुष्ठाकडे ॥ वायुतत्व मध्यमाकडे ॥ करंगुळीकडे वायु चढे ॥ तेजतत्व जाणिजे ॥ ७५ ॥ हा तत्वभेद जाणा ॥ साधकें आणावा मना ॥ नित्य करावी विवेचना ॥ विवेकीं पैं ॥ ७६ ॥ आणिक तत्वाची धारणा ॥ बिंदूनें लक्षावें गमना ॥ मध्यमावरी करावी भ्रमणा ॥ तें पृथ्वी तत्व ॥ ७७ ॥ उरावरी आदळे संपूर्ण ॥ तें आप तत्व ओळखिजे जाण ॥ मध्यमाभोंवतें संपूर्ण ॥ वायु तत्व ओळखे ॥ ७८ ॥ नासिकीं आदळोनि आकाशीं जाण ॥ आकाशतत्व निश्चय ॥ सैरावैरा गमनीं राहे ॥ तयासी

तें तत्व बोलिजे ॥ ७९ ॥ गौरी ये चौथी धारण ॥ उजवे नाकपुडी लागे पवन ॥ तेज जाणावें संपूर्ण ॥ बुद्धिमंतीं ॥ २८० ॥ डावे नाकपुडी लागे पवन ॥ तें आपतत्व ओळखिजे पूर्ण ॥ दोहों न लगतां वायु वाहे ॥ मिश्रवाहे तें पृथ्वी तत्व ॥ ८१ ॥ दोहीं दळीं व्यापक ॥ तें आकाश निश्चित ॥ ऐसें जाणावें संतजनीं ॥ निश्चयेसीं ॥ ८२ ॥ पांचांचे पंचवीस गुण ॥ हे वायुतत्वीं निर्माण ॥ कामधेनु नाम धारणा ॥ सत्रावी जीवकळा ॥ ८३ ॥ हा गुरुकृपें जाणावा प्रकाश ॥ शुद्ध शब्दाचा कीजे अभ्यास ॥ तोचि जाणावा परमहंस ॥ सद्गुरुकृपें ॥ ८४ ॥ चंद्राचे ठायीं राहे रेचक ॥ सूर्यावरी राहे पूरक ॥ संक्रमण वस्तीसी त्राहाटक ॥ निरशून्य कुंभक बोलिजे ॥ ८५ ॥ अहं सोहं मौन हृदयीं ॥ हेचि एकांताची सोइ ॥ हाचि पांचवा सूक्ष्म वेद पाहीं ॥ सद्गुरुमुखें ओळखावा ॥ ८६ ॥ पृथ्वी आप तेज वायु सूर्य ॥ कृत प्रश्नो शुभावह ॥ तेजा वायु आकाशो ॥ यदा प्रश्नोपि निष्फल ॥ ८७ ॥ आतां चंद्राची तिथी ॥ शुक्लपक्षीं जाणिजे निश्चिती ॥



१ । २ । ३ । ७ । ८ । ९ । १३ । १४ । १५ ॥ आतां कृष्णपक्षीची तिथी ॥ सूर्याची जाणिजे ॥ ८८ । १ । २ । ३ । ७ । ८ । ९ । १३ । १४ । ३० ॥ चंद्र कृष्णपक्षीं ॥ ४ । ५ । ६ । १० । ११ । १२ ॥ सूर्य शुक्लपक्षीं ॥ ४ । ५ । ६ । १० । ११ । १२ ॥ कृष्णपक्षीं चंद्राची तिथी जाणिजे ॥ श्वास वाहे अंगुळें बारा ॥ निद्रा काळीं ॥ ५४ ॥ अंगुळें ॥ मैथुनकाळीं अंगुळें ॥ ५४ ॥ धावन समयीं अंगुळें ॥ ४२ ॥ मैथुनें काया पडे हिंपुटी ॥ स्वर पडे काया होती कष्टी ॥ यालागीं परते दृष्टी ॥ प्राणिमात्रांची ॥ ८९ ॥ आतां सां[illegible] विचार ॥ आदितवार मंगळवार ॥ शनि अर्धा गुरुवार ॥ कृष्णपक्षीं क्रूरकर्मीं असे ॥ ॥ २९० ॥ चंद्राचे वारेश्वर सांगेन ॥ सोमशुक्र सोमनंदन ॥ अर्ध गुरुवार जाण ॥ शुक्लपक्षीं शुभ कार्या ॥ ९१ ॥ शुक्ल चंद्रवार दिशा तिथी ॥ हे शुभ कार्यास व्हावें युक्ती ॥ कृष्णपक्षीं सूर्यवार सूर्यतिथी ॥ क्रूरकर्मीं ओळखिजे ॥ ९२ ॥ निद्राकाळीं होती जागृत ॥ अनुभवावें चंद्र सूर्यातें ॥ सम विषम पाउलाचें गणित ॥ योजूनियां टाकिजे ॥ ९३ ॥ सोमवारीं प्रातः

काळीं सत्वर ॥ श्वास साधूनि पाउलें टाकावीं चार ॥ तेथें पवन सोडितां
चंद्र ॥ तें सफळ येर ते निर्फळ ॥ ९४ ॥ ऐसे कृष्णपक्षीं सूर्याचे वार ॥
जाणावे पैं निर्धार ॥ विषम पाउलें सूर्यावर ॥ सुफळ येर निर्फळ जाणिजे ॥
॥ ९५ ॥ सुषुम्ना वा संक्रमण ॥ हे काळाष्टक तया मरण ॥ ऐसें स्वरो-
दयांत जाण ॥ निवांत असावें ॥ ९६ ॥ सोम बुध चालावी चार पाउलें ॥
शुक्र दिनीं सहा वहिलें ॥ ऐसीं चंद्राचीं पाउलें ॥ मोजूनियां टाकावीं ॥
॥ ९७ ॥ रवि किंवा मंगळवारीं ॥ पांच किंवा नऊ निर्धारीं ॥ अकरा शनि
उदय तरी ॥ गुरु सप्त पाउलें ॥ ९८ ॥ हे वार यात्रा जाणावी ॥ तिथि वारीं
दिशा पहावी ॥ जे नाडी चाले तें पाउल पुढें ठेवावें ॥ चंद्रीं विषमा विषम ॥
॥ ९९ ॥ आतां प्रकृती सांगों तयांची ॥ आहार निद्रा मैथुन ॥ जांभई
आळस पृथ्वीचे ॥ गुण हे पैं ॥ ३०० ॥ लाळ मूत्र शोणित ॥ स्वेद आणि
रेत ॥ हे आपाचे गुण निश्चित ॥ जाण प्रिये ॥ १ ॥ धावन आणि चलन ॥
प्रसरण अकोचन ॥ हे वायूचे गुण ॥ पांच पैं ॥२॥ क्षुधा तृषा निद्रा आळस ॥



अहंकारादि पांच ॥ हे गुण साच ॥ तेजाचे पैं ॥ ३ ॥ काम क्रोध शोक मोह
भय ॥ हे पांच गुण आकाशाचे होय ॥ ऐसे पांचाचे पंचवीस निश्चयें ॥
स्थूळ शरीरीं असती ॥४॥ लक्ष लय ध्यान प्रकाशे ॥ जेणें दृष्टी अज्ञान नासे ॥
अभ्यासितां पाप दग्ध होतसे ॥ प्रसादें गुरुगम्य हें ॥ ५ ॥ रेचक आणि
पूरक ॥ कुंभक आणि त्राहाटक ॥ यांचे भेद सिद्ध साधक ॥ जाणती पैं
॥ ६ ॥ रेचकें शांतिक करावें ॥ पूरकें अशुभ जाणावें ॥ त्राहाटकें मारणादि
करावें ॥ कुंभक जाणावें गुरुमुखें ॥ ७ ॥ आतां स्त्रीचीं कामादिक ठिकाणें ॥
कामशास्त्राचे अनुक्रमानें ॥ शुक्लपक्ष कृष्णपक्ष जाणोन ॥ चढतां उतरतां
देखिजे ॥ ८ ॥ आतां निद्रा करी सूर्यावरी ॥ जागृत होय चंद्रावरी ॥ कां
चंद्रावरी निद्रा करी ॥ सूर्यावरी उठे जो ॥ ९ ॥ तयाचें शरीर सुखदायक ॥
जेथें तेथें मंगळदायक ॥ तो योगियांचा टिळक ॥ असोनि गृहाश्रमीं
॥ ३१० ॥ आतां पृथ्वीतत्वीं स्थीर कार्य करणें ॥ शुभकार्यादि अळंकार
भूषणें ॥ ग्राम प्रवेश मौजिबंधनें ॥ पृथ्वीतत्वीं करिजे हें ॥ ११ ॥ आपतत्वीं

विवाह लग्न ॥ यात्राभिषेक राज्यपदीं बैसणें ॥ विहिरि आड तळें ऊंस धान्य लावणें ॥ आपतत्वीं कीजे हें ॥ १२ ॥ समुद्रीं गंगाजळीं तरणें ॥ व्यवहारीं काळांतरीं बीज पेरणें ॥ राजमैत्री संघट्टण करणें ॥ आपतत्वीं साचार ॥ १३ ॥ जितुकें अशुभ कर्म ॥ त्याचें जाणावें हें वर्म ॥ जे जे आचरणें अधर्म ॥ ते अग्नितत्वीं करावे ॥ १४ ॥ वधुवरें मिरविजे ॥ गज घोडे बैल आणिजे ॥ अनेक वस्तु घेईंजे ॥ वायुतत्वीं निश्चयें ॥ १५ ॥ योग दानें तप कीजे ॥ मोक्षमंत्र उपदेश घेईंजे ॥ शुभ कर्मे कीजे ॥ आकाशतत्वीं ॥ १६ ॥ चंद्र वाहे तरी डावें पाउल पुढें ठेविजे ॥ पश्चिम दक्षिण पाठीं घेईंजे ॥ पूर्व उत्तर जाईंजे ॥ शुभ-कार्य निर्विघ्न पैं ॥ १७ ॥ सुषुम्ना संक्रमण होती ॥ चिंतिलें कार्य नाशिती ॥ आतां चंद्राचीं वर्णाक्षरें किती ॥ सतरा कोणतीं तीं सांगों ॥ १८ ॥ कखगघङ चछजझञटठडढणतथ ॥ सूर्याचीं ॥ दधनपफबभमयरलवशषसहळक्ष ॥ चंद्रा-क्षरी करितां प्रश्न ॥ कार्य घडे तत्क्षणीं ॥ हें जाणिजे लक्षणीं ॥ प्रतिज्ञा करोनी ॥ १९ ॥ सूर्यनाडी वाहे जरी ॥ कार्य होय दोनप्रहरीं ॥ हें जाणावें चतुरीं ॥




वर्णप्रश्न ॥ ३२० ॥ ग्रामा जातां दोन वांटा ॥ तेथें स्थिर राहावें निकटा ॥ जो स्वर वाहे तेचि वाटा ॥ पाउलें ठेवोनि जाईंजे ॥ २१ ॥ ग्रामाजवळी गेलियावरी ॥ उभें रहावें क्षणभरी ॥ शुभ कार्यासी चंद्र धरी ॥ क्रूर कार्यासी सूर्य पैं ॥ २२ ॥ जी जी हे चंद्रमौळी ॥ साधका अन्न उदक कोण सांभाळी ॥ अन्नोदक तया लागोन ॥ कैसें मिळे ॥ २३ ॥ साधकें करावा तत्वविचार ॥ तेणेंकरूनि पुष्ट राहे शरीर ॥ तृषा फार लागली जरी ॥ चंद्रस्वर ऊर्ध्व घ्यावा ॥ २४ ॥ सूर्याचें जें ऊर्ध्वशून्य घर ॥ शनैः शनैः अभ्यासावें निरंतर ॥ तयासी सत्रावीचें अमृतपान ॥ तेणें तृषा जाय पैं ॥ २५ ॥ मग जरी तृषा क्षुधा लागली फार ॥ तरी सूर्य आणि ओंकार ॥ शून्य मंदिरीं चंद्राचें घर ॥ हळू हळू मंद आणिजे ॥ २६ ॥ मध्यमेसी दडपिजे अंगुष्ठें ॥ सूर्या कीजे उफराटें ॥ आणि चंद्रावाटें ॥ क्षुधा हारपे क्षणांत ॥ २७ ॥ तयासी न लागे शीत उष्ण ॥ न लागे कंथा प्रावरण ॥ ही युक्ति विरळा जाणे ॥ सद्गुरुभक्त जो ॥ २८ ॥ जिव्हा टाळूसि लावी उफराटी ॥ त्रैलोक्यींचा विचार दृष्टी ॥ षण्मुख मुद्रेची रहाटी ॥ सहजीं

सहज येतसे ॥ २९ ॥ स्वस्वरूपीं आनंद ॥ निजनामें ब्रह्मानंद ॥ तेचि एक परमानंद ॥ डुल्लती सदा ॥ ३३० ॥ सुषुम्ना सांधिजे ॥ योगी पूर्ण होईजें ॥ मोक्षपदासी जाईजे ॥ संदेह नाहीं ॥ ३१ ॥ हा पवन विजय ग्रंथ ॥ संस्कृतावरूनि प्राकृत ॥ जे नित्य पाहोनि अनुभवित ॥ सर्व कामना पूर्ण होती ॥३३२॥ इति श्रीमुकुंदराजकृत पवनविजय ग्रंथ समाप्त ॥ शुभं भवतु ॥

गांवास गेलेला कधीं परत येईल

| तत्त्वें | गु. | रंग | प्रकृती | वायुस्वर | प्रश्न | उत्तर |
|---|---|---|---|---|---|---|
| आकाश | शोक | काळें | कटु | अंगुष्ठाकडे | देशांतरास गेला | मृत्यु |
| वायु | भय | निळें | आंबट | मध्यमाकडे | पश्चिमेस | भयसांगे |
| तेज | शोक | रक्त | तिखट | करांगुलीकडे | पूर्वदिशेस | लाभहानी |
| आप् | सौख्य | श्वेत | खारट | कोपराकडे | लांबला | लाभेसी भेटे |
| पृथ्वी | सौख्य | पीत | मधुर | तळमध्य | उत्तरदिशेस | लाभबहुतां |

मुद्रक व प्रकाशक—दत्तात्रय विश्वनाथ पाठक, जगदीश्वर प्रिं. प्रेस, गिरगांव, गायवाडी, मुंबई नं. ४
आवृत्ति १३ वी ] [ सन १९६२